जलसंपदा प्रकल्पातून बिगर सिंचन पाणी आरक्षणाच्या प्रस्तावास मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
जलसंपदा विभाग
शासन निर्णय क्रमांक. बिसिंआ-२०१७/(१५९/१७)/सिं.व्य.(धो)
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : १०/१०/२०१७

संदर्भ: जलसंपदा विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण २०१५/(४४/१५)/सिं.व्य (धो), दि.१७/११/२०१६

प्रस्तावना :-

१.० महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण (सुधारणा व पुढे चालू ठेवणे) अधिनियम, २०११ यातील कलम ५ मधील १६(क) नुसार जलसंपत्ती प्रकल्पांमधील पाण्याचे क्षेत्रीय वाटप राज्य मंत्रीमंडळाकडून केले जाईल अशी तरतूद करण्यात आली आहे. संदर्भिय शासन निर्णय क्र.१ अन्वये राज्यातील पाटबंधारे प्रकल्पांचे क्षेत्रिय वाटप राज्य मंत्रीमंडळाने निर्धारित केले आहे. या शासन निर्णयातील परिच्छेद क्र. २.३ मधील तरतुदीनुसार पिण्याच्या व औद्योगिक पाणी वापराच्या आरक्षण प्रस्तावांना मान्यता देण्याचे अधिकार मा.मंत्रीमंडळ उपसमितीला देण्यात आले आहेत. या अनुषंगाने शासनास प्राप्त झालेल्या खालील प्रस्तावांना मंजुरी देण्याचे शासनाच्या विचाराधीन होते.

शासन निर्णय :-

२.० दि. १८/०७/२०१७ रोजी झालेल्या मा.मंत्रीमंडळ उपसमितीच्या बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार खालील तक्त्यातील रकाना क्र.२ मध्ये नमुद संस्थेला त्यांचे नावासमोर रकाना क्र.४ मध्ये नमूद पाणी आरक्षणास, परिच्छेद ३.० मधील अटींच्या अधीन राहून मान्यता देण्यात येत आहे.

अ.क्र.	पाणी आरक्षणाची मागणी करणाऱ्या संस्थेचे नांव	पाणी मागणीचा प्रकार	मंजूर केलेले पाणी आरक्षण (दलघमी)	जलाशय/कालवा/ नदीचे नांव	आरक्षणामुळे होणारी सिंचन कपात (हेक्टर)
१	२	३	४	५	६
१.	महाराष्ट्र जीवन प्राधिकरण न्हावा शेवा पाणी पुरवठा योजना टप्पा ३ पनवेल जि.रायगड पाणी आरक्षण प्रस्ताव	औद्योगिक	२२.२६५	पाताळगंगा नदीतून	निरंक
२.	वाढीव उभ्दव शहापाडा प्रादेशिक पाणी पुरवठा योजना, ता.पेण, जि.रायगड, हेटवणे धरण ते शहापाडा धरण जलशुध्दीकरण केंद्र, हेटवणे मध्यम प्रकल्पातुन पाणी आरक्षण मिळणेबाबत	घरगुती	२.००	हेटवणे धरण	१३८
३.	पॅक्ट रिअल इस्टेट प्रा.लि. पिरंगूद ता.मुळशी जि.पुणे	घरगुती	०.३४४२	मुळशी मध्यम प्रकल्प/ मुळा नदी	५०.६४

४.	कॅलीक्स मर्लीन व्हेंचर्स एलएलपी कासार अंबोली ता.मुळशी जि.पुणे	घरगुती	०.८३८७	मुळशी मध्यम प्रकल्प/ मुळा नदी	१२३.४१
५.	मांजरी स्टड फार्म प्रा.लि. फुरसुंगी, ता.हवेली, जि.पुणे	घरगुती व औद्योगिक	घ- ०.०७५ औ- १.१६४ ए - १.२३९	खडकवासला प्रकल्प नवीन मुठा उजवा कालवा कि.मी. क्र.२६	४५.८३
६.	महाराष्ट्र जीवन प्राधिकरण अंतर्गत नगरोत्थान योजनेंतर्गत सावली पाणी पूरवठा योजना, ता.सावली, जि.चंद्रपूर करिता वैनगंगा नदीवरून कवठी या गावाजवळून ०.६४ दलघमी चा पाणी आरक्षण प्रस्ताव	घरगुती	०.६४	वैनगंगा नदीवरून कवठी गावाजवळून	निरंक
७.	महाराष्ट्र जीवन प्राधिकरण अंतर्गत मुल तालुका २४ गांवे प्रादेशिक पाणी पुरवठा योजना, ता. मुल, जि.चंद्रपूर	घरगुती	१.१०	वैनगंगा नदीतून	निरंक
८.	महाराष्ट्र जीवन प्राधिकरण अंतर्गत वर्धा नदीवरील बल्लारपूर तालुक्यातील (जि.चंद्रपूर) १८ गावां ची ग्रीड पाणी पूरवठा योजना	घरगुती	१.५०	वर्धा नदीतून	निरंक

३.० उपरोक्त नमूद प्रस्तावांना खालील अटींच्या अधीन राहून मान्यता देण्यात आली आहे.

१. सदर पाणी आरक्षण मंजुरी मुळे होणाऱ्या सिंचन कपातीपोटी सिंचन पुन:स्थापनेचा खर्च शासन परिपत्रक क्र. संकिर्ण-२००८/ (१३१/०८)/ सिंव्य (धोरण), दि.०६.०३.२००९ नुसार रु.१ लक्ष प्रति हेक्टर प्रमाणे (Base Year २००९) आधिक भाववाढ निर्देशांक (Cost Inflation Index) विचारात घेऊन येणारी रक्कम अथवा प्रत्यक्ष करारनामा करतेवेळी लागू असलेला शासनाचा प्रचलित दर यापैकी जो जास्त असेल त्या दराने सिंचन पुन:स्थापनेचा खर्च करारनामा करणेपुर्वी संस्थेकडून घेण्यात यावा.

२. बिगर सिंचन पाणी पूरवठ्यासाठी करारनाम्याचा सुधारीत नमुना व मार्गदर्शक सूचना महाराष्ट्र शासन पाटबंधारे विभाग शासन परिपत्रक क्र. बिपापू -१०००/ (७१३/२००१)/ सिंव्य धोरण, मुंबई ३२, दि.११.०६.२००३ व दि.०७.०४.२००३ अन्वये निर्गमित केल्या आहेत. त्यानुसार करारनामा करण्यात यावा.

३. जलस्त्रोत प्रदुषित करणाऱ्या पाणी वापरकर्त्याकडून दंडनीय पाणीपट्टी आकारणी करणेबाबत मार्गदर्शक तत्वे या विषयाबाबत शासन निर्णय क्र. पापव २०१५/ (प्र.क्र. ८८/२०१५)/सिंव्य (महसूल), दि.२१/४/२०१६ मधील अटींचे पालन करणे पाणी वापरकर्त्यांना बंधनकारक राहील.

४. महाराष्ट्र शासन जलसंपदा विभाग शासन निर्णय क्र.संकिर्ण-२०१०/(४०७/१०)सिंव्य (धोरण), दि.२९.०६.२०११ अन्वये करारनामा करताना बिगरसिंचन पाणीवापर कर्ते अंतिम पाणी मागणीप्रमाणे टप्पाटप्पाने पाणीवापर करण्याचे नियोजन नमुद करू शकतील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०१७१०१०१६५७०५०८२७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Atul Ashok Kapole

Digitally signed by Atul Ashok Kapole
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water Resources Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=797fcfe0bb4a86dd814129f50d05c1d249ea6f0acc364c6214f11ff7174bd5ef, serialNumber=ae2c4f4c985d3e984de94324901263d48766ec651dea49d652faf11a96aa98b5, cn=Atul Ashok Kapole
Date: 2017.10.10 16:48:44 +05'30'

(अ.अ.कपोले)
शासनाचे उप सचिव

प्रति,

१. मा. राज्यपालांचे सचिव.
२. मा. मुख्यमंत्र्यांचे सचिव.
३. मा. अध्यक्ष/उपाध्यक्ष, विधानसभा, विधानभवन, मुंबई.
४. मा. सभापती/उपसभापती, विधानपरिषद, विधानभवन, मुंबई.
५. मा. विराधी पक्षनेते, विधानसभा, मुंबई यांचे कार्यालय, विधानभवन, मुंबई.
६. मा. विराधी पक्षनेते, विधानपरिषद, मुंबई यांचे कार्यालय, विधानभवन, मुंबई.
७. सर्व मा. मंत्री यांचे खाजगी सचिव.
८. सर्व मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव.
९. सचिव, महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण, मुंबई.
१०. प्रधान सचिव (जलसंपदा), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
११. सचिव (जसंव्य व लाक्षेवि), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२. सर्व कार्यकारी संचालक, जलसंपदा विभाग, मुंबई.
१३. मुख्य अभियंता (पा) व सहसचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
१४. मुख्य अभियंता (जसं), जलसंपदा विभाग, उत्तर महाराष्ट्र प्रदेश, नाशिक
१५. मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, कोकण प्रदेश,मुंबई
१६. मुख्य अभियंता तापी पाटबंधारे विकास महामंडळ,जळगाव
१७. मुख्य अभियंता व मुख्य प्रशासक (लाक्षेविप्र),औरंगाबाद
१८. मुख्य अभियंता (जसं), जलसंपदा विभाग, पुणे.
१९. मुख्य अभियंता (जसं), जलसंपदा विभाग, नागपूर
२०. निवडनस्ती कार्यासन सिंव्य (धोरण).